# पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई

भारतीय रिझर्व्ह बँकेसमोर, से.१०, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

- ०२२-२७५७ २२३६. **Email** - establishmentbr-nm@mahapolice.gov.in


पोआ/नमुं/आस्थ-६/चा.पो.शि.भ./२०२४-२५/कौशल्य चाचणी वेळापत्रक/ १०० /२०२६, नवी मुंबई, दि.३०/०३/२०२६

## पोलीस शिपाई चालक भरती सन २०२४-२०२५

**-: वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीच्या वेळापत्रकाबाबत :-**

पोलीस शिपाई चालक पदाची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी दिनांक २३/०३/२०२६ ते दिनांक ०२/०४/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली असुन त्याबाबत नवी मुंबई पोलीस संकेतस्थळावर सविस्तर वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर वेळापत्रकानुसार पुरुषांची वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीची शेवटची तारीख दि.३१/०३/२०२६ अशी आहे.

जे पुरुष उमेदवार वैद्यकिय कारणास्तव अगर वैयक्तिक अपरिहार्य कारणामुळे त्यांना नेमलेल्या तारखेस वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीस उपस्थित राहु शकले नाहीत त्यांना एक वेळची अखेरची संधी देण्यात येत असुन त्यांनी दिनांक ३१/०३/२०२६ रोजी सकाळी ०५.०० वा. वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीकरीता **पोलीस परेड ग्राऊंड, पोलीस मुख्यालय, रोडपाली, कळंबोली नवी मुंबई** येथे **मुळ वाहन चालक परवाना, मैदानी चाचणीचे प्रवेशपत्र, आधारकार्ड** (छायांकित प्रतीसह) व **०२ (दोन) पासपोर्ट साईज फोटो** इत्यादींसह उपस्थित रहावे.

नवी मुंबई पोलीस संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार महिलांची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी दिनांक ०१/०४/२०२६ व दिनांक ०२/०४/२०२६ रोजी घेण्यात येणार आहे. कौशल्य चाचणीच्या नेमुन दिलेल्या तारखा महिला उमेदवारांना गैरसोयीच्या असतील त्यांनी उक्त नमुद दोन्हीपैकी कोणत्याही दिवशी उपस्थित राहु शकतात. नमुद दोन्ही तारखेव्यतिरिक्त त्यांना तारीख बदलुन दिली जाणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- ३०/०३/२०२६
ठिकाण :- नवी मुंबई

( संजयकुमार पाटील )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय
नवी मुंबई

Scanned with OKEN Scanner